

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

परळी

# संघर्षनेता

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे




बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 238 | सोमवार दि. 15 सप्टेंबर 2025 | पृष्ठे 4 किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# महाराष्ट्रात सामाजिक वीण उसवतेय, समाजात कटूता निर्माण होणारे निर्णय घेतले जातायत" : शरद पवार



हैदराबाद गॅझेटवर आधारित निर्णय घ्यावा असे सांगण्यात आले. पण या गॅझेटमध्ये काही विशेष सवलती देण्यात आल्या आहेत. व्हीजेएंटी बंजारा यांना आदिवासीच स्थान यामध्ये देण्यात आले आहे. आता बंजारा समाजाने मागणी सुरु केली आहे की, काही झाले तरी चालेल पण आता आम्हाला आदिवासीमध्ये घातले पाहिजे. याचा अर्थ काय तर समाजांमध्ये कटूता वाढेल असे निर्णय घेतले जात आहेत. महाराष्ट्राची सामाजिक वीण उसवायला लागली आहे, ही अतिशय चिंतेची बाब आहे, असे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवार गटाच्या वतीने पदाधिकारी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शरद पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आरक्षणाबाबत राज्य सरकारने मराठा आणि ओबीसी समाजाच्या तयार केलेल्या समित्यांमध्ये संबंधित समाजाच्याच व्यक्तींचा समावेश केला गेला. अशा समित्या एका जातीच्या करायच्या नसतात. त्यामध्ये सर्व जातींचा समावेश असावा लागतो. असे जातीच्या समित्या काढणे धोकादायक असून राज्य सरकारच कटूता वाढविण्यासारखे निर्णय घेत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक वीण उसवायला लागली आहे, अशी टीका शरद पवार यांनी केली.मराठा, ओबीसी आरक्षणाबाबत स्थापन केलेल्या उपसमित्यांमध्ये कुणाला स्थान मिळाले, याचा दाखला देत शरद पवार यांनी राज्य सरकारने हा प्रश्न योग्य प्रकारे हाताळला नाही, तर सामाजिक वीण विस्कटणे अत्यंत धोकादायक आहे. सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी आपल्या पक्षाला कितीही राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल, पण यात कदापि तडजोड होणार नाही. पदाधिकाऱ्यांनी सामाजिक कटूता कमी करण्यासाठी काम करावे, असे शरद पवारांनी सूचित केले.

दरम्यान, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात ओबीसी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत सगळे ओबीसी नेते आहेत. तर दुसरीकडे मराठा समाजासाठी जी समिती नेमण्यात आली तर त्यात महाजन पान 3 वर

# आरक्षणावरून सीएम फडणवीसांचा विरोधकांवर हल्लाबोल



सध्या राज्यभरात मराठा व ओबीसी आरक्षणाचा मुद्दा तापला आहे. त्यामुळे सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. त्यातच आता आरक्षणाच्या मुद्दयावरून सीएम देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांवर हल्लाबोल केला आहे. एकही नकली व्यक्तीला ओबीसींचे आरक्षण दिले जाणार नाही, असे पुण्यात प्रसार माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट केले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे (Uddhav Thackeray ) यांनी घालवलेले ओबीसी समाजाचे आरक्षण आता आमच्या सरकारने आणले आहे . एकही नकली व्यक्ती हा ओबीसीमध्ये समाविष्ट होणार नाही. नकलीचा अर्थ जो ओबीसीत नाही असा, अशी व्यक्ती ओबीसीत सहभागी होणार नाही, अशा प्रकारची काळजी जीआरमध्ये घेतलेली आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांना तर बोलण्याचा अधिकारच नाही. कारण ओबीसींसाठी जे काही केले आहे ते आमच्याच सरकारने केले आहे. त्यामुळे ओबीसी समाजाने चिंता करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.2014 ते 2025 मध्ये जेवढे निर्णय ओबीसी समाजासाठी झाले ते आमच्या सरकारने घेतले. ओबीसींचं वेगळं मंत्रालय करणारे आम्ही आहोत, ओबीसींसाठी आम्ही योजना आणल्या, आम्ही महाज्योती तयार केली, तसेच ओबीसी विद्यार्थ्यांसाठी सुरु वसतीगृह केले, तसेच ओबीसींचं राजकीय पान 3 वर

## आज ठळक

### हैदराबाद गॅझेटचा रिझल्ट तर येऊद्या; आधीच 'हलकल्लोळ' कशाला ?

#### सुरेश धस यांचा 'सबुरी'चा सल्ला




मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानात केलेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला. या गॅझेट लागू करण्याच्या निर्णयानंतर ओबीसी समाजात प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. यावरून राज्यात पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी असा संघर्ष भडकला आहे. या पार्श्वभूमीवर भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी मराठा आणि ओबीसी समाजाच्या नेत्यांना एक सल्ला दिला.हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय त्याचा किती परिणाम होतो याचा रिझल्ट अद्याप लागलेला नाही. त्याआधीच दोन समाजांनी आपापल्या पद्धतीने त्याचे अर्थ काढून 'हलकल्लोळ'करणे योग्य नाही. सोशल मिडिया आणि रस्त्यावर एकमेकांच्या विरोधात उतरण्याची भाषा योग्य नाही. सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत राहून मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजाच्या नेत्यांनी सबुरीने घ्यावे, असा सल्लाही पान 3 वर

### तुम्ही आता मागास झालात, आपआपसात विवाह ठरवूया; प्रा. लक्ष्मण हाके यांचा मनोज जरांगे यांना प्रस्ताव



बीडः तुम्ही मागास झालात ना ? तर आता जरांगे यांना माझे सांगणे आहे. कुणबी प्रमाणपत्राद्वारे तुम्ही ओबीसीमध्ये आलात. तर आम्ही आमच्यातील क्वालिफाईड पोरं सुचवतो. आता पहिले 11 विवाह आपआपल्यामध्ये ठरवूयात, तुम्ही आमच्यात आल्याने आता जातपात राहिली का? पाटील, 96 कुळी, क्षत्रिय तुम्ही राहिले का? त्यामुळे 11 विवाह जाहीर करू, असे ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके शुक्रवारी रात्री भर सभेत म्हणाले. ओबीसी समाजातील तरुणांच्या लग्नाचा प्रस्तावच त्यांनी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्यासमोर यावेळी मांडला. शिरूर तालुक्यातील श्रृंगारवाडीत शुक्रवारी रात्री आयोजित ओबीसी महाएल्गार मेळाव्यात प्रा. हाके हे बोलत होते. आमदार विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके आणि खासदार बजरंग सोनवणे यांच्यावरही त्यांनी टीका केली.दरम्यान ओबीस-मराठा समाजात एकमेकांच्या भाषेतून द्वेष निर्माण होत आहे, ते कुठेतरी थांबले पाहिजे. आक्रमकपणे बोलून प्रश्न सुटत नसतात, असे भाजपचे आमदार सुरेश धस यांनी शनिवारी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# चित्रकार श्रीकांत दहिवाळ यांचे चित्र दिल्ली येथील चित्रप्रदर्शनात झळकणार

## परळीच्या भुमीपुत्राच्या कलेचं कौतुक



परळी (प्रतिनिधी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत विवेकानंद युथ कनेक्ट फाउंडेशनच्या वतीने दिल्ली येथे दि.17 ते 21 सप्टेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला प्रदर्शनात परळी येथील प्रसिध्द चित्रकार श्रीकांत दहिवाळ यांच्या चित्रांची निवड झाली आहे.या चित्रप्रदर्शनात दहिवाळ यांच्यासह 65 चित्रांचा समावेश आहे.

पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या अंतर्गत विवेकानंद युथ कनेक्ट फाउंडेशनच्या वतीने डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर,15 जनपथ रोड, नवी दिल्ली-01 येथे राष्ट्रीय पातळीवरील चित्र प्रदर्शन आयोजित केले आहे.या चित्र प्रदर्शनाचे दि.17 सप्टेंबर रोजी मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी दत्तात्रय दहिवाळ गुरुजी यांचा चित्रकलेचा वारसा त्याच योग्यतेने जोपासणारे व पुढे नेणारे श्रीकांत दहिवाळ यांचे चित्र पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमीत्त देशभरातील चित्रकारांकडुन मागवण्यात आलेल्या चित्रांच्या प्रदर्शनात प्रदर्शित होणे ही परळीकरांसाठी अभिमानाची बाब आहे

## फटाक्यांचा पाऊस, जंगी स्वागत, बीडचा गुंड तुरुंगाबाहेर येताच तुफान जल्लोष!




गुन्हेगारीच्या घटनांमुळे बीड जिल्हा गेल्या काही महिन्यांपासून चर्चेत आहे. अशातच आता एका गुंडाचे तुरुंगातून सुटल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत स्वागत केल्याचा प्रकार समोर आला आहे. बीड शहरातील सराईत गुन्हेगार शेख नवीद शेख चाँद या गुंडावर बीड पोलिसांनी MPDA अंतर्गत 3 जुन 2025 रोजी कारवाई केली होती. त्याच्यावर पेठ बीड पोलीस ठाण्यात अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. मात्र आता पान 3 वर

# बंजारा समाजाला ST प्रवर्गातु आरक्षण मिळावे यासाठी बीडला सोमवारी मोर्चा

## मोर्चात परळी तालुक्यातील हजारो बंजारा समाजबांधव होणार सहभागी



परळी वै. ता.13 प्रतिनिधी बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी सोमवारी (ता.15) बीड येथिल जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चात परळी तालुक्यातील हजारो समाजबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल बंजारा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

परळी येथील जिजामाता उद्यानात शनिवारी (ता 13) सकाळी 11:00 वाजता तालुक्यातील बंजारा समाजातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. बैठकीत बंजारा समाजाचा हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (st) प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी सोमवारी (ता15) बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.मोर्चाच्या नियोजनासाठी परळी तालुक्यातील पान 3 वर

# जि.प.पं.समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळीत महाविकास आघाडीची मोर्चे बांधणी



परळी प्रतिनिधी जिल्हा परिषद, पंचायत समिती संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने आरक्षण जाहीर करण्यात आल्याने काही दिवसावरच निवडणुका जाहीर होण्याची शक्यता समोर ठेऊन परळीच्या महाविकास आघाडी प्रमुख नेत्यांची प्राथमिक बैठक घेण्यात आली.

या बैठकीला काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट, कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांची बैठक घेण्यात आली. याबैठकीत जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणूक संदर्भात चर्चा विनिमय करण्यात आली लवकरच सर्व आघाडी पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची निवडणुकी संदर्भात सविस्तर बैठक घेण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

संपन्न झालेल्या बैठकीत कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. पी.एस. घाडगे,पांडुरंग पान 3 वर

## मराठा मुलींबद्दल वादग्रस्त विधान : बीडमध्ये लक्ष्मण हाकेंविरोधात गुन्हा दाखल



गेवराई : मराठी मुलीबद्दल श्रृंगारवाडीत केलेल्या वादग्रस्त विधानावरून गेवराईतील तलवाडा पोलीस ठाण्यात प्रा. लक्ष्मण हाके यांच्या विरोधात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेवराईच्या श्रृंगारवाडीत ओबीसीच्या मेळाव्यात बोलताना प्रा.लक्ष्मण हाके यांनी मराठा समाज आणि मुलीबद्दल वादग्रस्त विधान केले होते. मराठा समाजातील मुलीचे पान 3 वर

## एसटी प्रवर्गातील आरक्षणासाठी निघणाऱ्या मोर्चात जिल्ह्यातील बंजारा समाजानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. बाळासाहेब (पप्पु) चव्हाण



परळी वै. ता.14 प्रतिनिधी बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी सोमवारी (ता.15) बीड येथिल जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा चे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात बीड जिल्ह्यातील बंजारा समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येनी सहभागी व्हावे असे आवाहन वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांनी केले आहे.

बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसुचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी बीड च्या जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी (ता 15) भव्य मोर्चा निघणार आहे. बीड येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चाची सुरुवात सकाळी दहा होणार पान 3 वर

# बंजारा समाजाला ST आरक्षण मिळावे यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा

## समस्त समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – शरदभाऊराठोड




अंबाजोगाई / प्रतिनिधी – बंजारा समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या न्याय्य व अत्यंत महत्त्वाच्या मागणीसाठी आज सोमवार, दि. 15 सप्टेंबर रोजी बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

या ऐतिहासिक लढ्याला अधिक बळकटी मिळावी म्हणून संपूर्ण बीड जिल्ह्यातील हजारो बंजारा बांधव एकवटणार असून, या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव शरदभाऊ राठोड यांनी समाजबांधवांना केले आहे.

हैदराबाद गॅझेट हा पान 3 वर

# स्वप्नांचा मेळावा – झोपेतला मेंदू



आपण झोपलो की आपला मेंदू थांबत नाही. तो आपलं शरीर विश्रांती घेऊ देतो, पण स्वतः मात्र सतत काम करत राहतो.

झोपेत काय घडतं?

मेंदू दिवसभर आपण जे शिकलो, पाहिलं किंवा अनुभवलं ते नीट लावून ठेवतो. जणू तो सगळी माहिती कपाटात फाईल करून ठेवतो.

स्वप्नं का पडतात?

आपण झोपेत असताना मेंदू आपल्या आठवणी, भावना आणि कल्पना एकत्र करून चित्रं दाखवतो. त्यालाच स्वप्नं म्हणतात. कधी मजेदार, कधी भीतीदायक अशी ही स्वप्नं आपल्या मनात तयार होतात.

झोप का महत्त्वाची आहे?

झोप घेतल्यावर आपला मेंदू ताजातवाना होतो. तो नवे धडे शिकायला तयार होतो. जर नीट झोप झाली नाही तर आपण चिडचिडे होतो, लक्ष केंद्रित होत नाही आणि गोष्टी पटकन विसरतो.

थोडक्यात, झोपेतला मेंदू हा एक स्वच्छता करणारा कामगार आणि जादूगार दोन्ही आहे. तो आठवणी नीट लावतो, भावना हलक्या करतो आणि स्वप्नांद्वारे आपल्याला एक वेगळी दुनिया दाखवतो.

➡ लेखक मुक्त पत्रकार धनंजय माने महाराष्ट्र सॅम्पल डेटा निरीक्षक

# आरक्षण व न्यायप्रक्रिया : राजकारणी आणि माध्यमांचा हस्तक्षेप

डॉ. भारत कऱ्हाड

आरक्षणाचा विषय आज समाजात अत्यंत संवेदनशील आणि गोंधळजनक बनला आहे. एका बाजूला समाजाच्या विविध घटकांनी आपली मागणी मांडली आहे, तर दुसऱ्या बाजूला या विषयावर न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे. अशा परिस्थितीत, सर्वात महत्त्वाचे आहे की न्यायालयीन प्रक्रिया आणि कायदेशीर चौकट यांचा सन्मान राखला जावा. न्यायालयीन प्रकरण सुरु असताना कोणतीही अतिरेक किंवा अवास्तव माहिती प्रसारित केली गेली, तर ती फक्त वाद वाढवते आणि निष्पक्ष निकालावर परिणाम करू शकते.

सरकारने काही निर्णय घेतले असले, तरी तो निर्णय केवळ आपली बाजू मांडण्यासाठी असतो; अंतिम अधिकार न्यायालयाचा असतो. निकाल येईपर्यंत कोणतीही अंमलबजावणी केली गेली, तर ती बेकायदेशीर ठरते. त्यामुळे सरकारला दोष देण्याऐवजी न्यायालयीन प्रक्रियेची प्रतीक्षा करणे गरजेचे आहे. तसेच, समाजातील प्रत्येक घटकाने हा भेद समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या काळात समाज माध्यमे माहिती पसरवण्यासाठी सर्वात वेगवान साधन बनली आहेत. परंतु अनेकदा ती चुकीची किंवा अपूर्ण माहिती प्रसारित करतात. न्यायालयीन विचाराधीन प्रकरणांबाबत अफवा, भडकावणारे विश्लेषण किंवा वैयक्तिक मतप्रदर्शन समाज माध्यमांवर प्रचंड प्रमाणात पसरते. ही माहिती समाजातील दोन गटांमध्ये अविश्वास आणि तणाव निर्माण करते. त्यामुळे समाजाचे नेते आणि माध्यमांवर संयम पाळणे, सत्यापित माहितीच प्रसारित करणे आणि न्यायालयीन प्रकरणांवर अवास्तव चर्चा टाळणे गरजेचे आहे.

न्यायालयाने वेळोवेळी माध्यमांना ताकीद दिली आहे की न्यायालयीन विचाराधीन प्रकरणांवर मोकाट चर्चा करू नये. Sub Judice तत्त्वानुसार, न्यायालयीन प्रकरणावर दिशाभूल करणारी किंवा भडकावणारी माहिती प्रसारित करणे अवमानास पात्र ठरते. अशा चर्चेमुळे न्यायालयावर अप्रत्यक्ष दबाव येऊ शकतो आणि न्यायप्रक्रिया प्रदीर्घ होऊ शकते. न्यायालयाकडे ही अपेक्षा असते की मीडिया, समाजाचे नेते आणि समाज माध्यमे संयम पाळतील आणि कायदेशीर चौकटीत राहून माहिती प्रसारित करतील.

सामाजिक दृष्टिकोनातूनही हे महत्वाचे आहे की, दोन समाजगट एकमेकांना हलक्यात घेऊ नयेत. आक्रमकता किंवा धमक्या फक्त वाद वाढवतात; त्यातून कोणताही तात्काळ फायदा होत नाही, उलट दीर्घकालीन नुकसान संभवते. सुसंवाद, स्थानिक प्रतिनिधींमधील चर्चा आणि कायदेशीर मार्ग वापरुनच मुद्दे मांडणे अधिक परिणामकारक उपाय आहे.

सरकारने घेतलेल्या निर्णयामागील कायदेशीर प्रक्रिया, अटी-शर्ती आणि प्रभाव याबाबत अवास्तव चर्चा टाळणे गरजेचे आहे. न्यायालयीन प्रक्रियेवर अवास्तव टीका किंवा अफवा प्रसारित केल्यास समाजातील तणाव वाढतो. त्यामुळे न्यायालयाने या प्रकारच्या प्रसारावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. समाज माध्यमांवर संयम आणला तर प्रकरण शांततेने पुढे जाऊ शकते आणि न्यायप्रक्रियेवर परिणाम होणार नाही.

आर्थिक आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही स्पष्टता आवश्यक आहे. गावपातळीवरील समित्या, पारदर्शक नियमावली आणि योग्य दस्तऐवजीकरण या गोष्टींचे पालन करणे गरजेचे आहे. निर्णयाची भाषा स्पष्ट असावी, पात्रता, नातेवाईक संबंध यांचा भेद नीट सांगितला पाहिजे, जेणेकरून संभ्रम निर्माण होणार नाही. न्यायालयीन प्रक्रियेवर अवलंबून राहूनच निर्णयाची अंमलबजावणी करणे हितावह ठरते.

न्यायालयीन प्रक्रियेचा सन्मान राखल्यास समाजातील घटकांमध्ये अविश्वास कमी होतो आणि न्यायालयीन प्रक्रिया निर्विघ्नपणे चालते. समाज माध्यमांनी तेल ओतण्याऐवजी संयम बाळगून योग्य माहिती प्रसारित केली पाहिजे. व्यक्तीगत आरोप, अपमानकारक वक्तव्य किंवा भडकावणारे भाष्य करणे टाळले पाहिजे. न्यायालयीन प्रकरणांवर योग्य मार्गाने, अधिकृत आणि सत्य माहितीच्या आधारावरच चर्चासत्र घ्यावे.

थोडक्यात, आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर न्यायालयीन प्रक्रिया सुरु असताना संयम राखणे, कायदेशीर चौकट पाळणे आणि समाज माध्यमांवर जबाबदारी ठेवणे हे अत्यावश्यक आहे. सरकार फक्त आपली बाजू मांडू शकते; अंतिम निर्णय न्यायालयाचा असतो. आक्रमकतेऐवजी सुसंवाद, संयम आणि पारदर्शकता यावर भर दिल्यास समाजातील शांतता टिकवता येईल आणि न्यायालयीन प्रक्रियेवर कोणताही अप्रत्यक्ष दबाव येणार नाही.

निष्कर्षतः, न्यायालयीन प्रकरणांवर अवास्तव चर्चा टाळावी, समाजाचे नेते आणि माध्यमांनी संयम राखावा, सरकारला दोष न देता न्यायालयीन निकालाची वाट पाहावी, आणि समाजातील घटकांनी एकमेकांशी आदराने वागावे. अशा प्रकारे संयम, कायदेशीरता आणि सामाजिक जबाबदारी राखणेच या संवेदनशील विषयाचे योग्य समाधान ठरु शकते. समाज माध्यमांचा जबाबदार वापर, सुसंवाद आणि न्यायालयीन प्रक्रिया यांचा सन्मान हेच आजच्या घडीला सर्वात महत्त्वाचे आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# शोध एक वाटेर “हैद्राबाद गॅजेट्सनुसार हक्क द्या”

हैद्राबाद गॅजेट्समध्ये स्पष्ट नमूद असूनही, बंजारा समाजाला आजही एस.टी. आरक्षणापासून वंचित ठेवण्यात आले आहे. हा सरळसरळ अन्याय आहे!

आज क्रांतिकारक विनोद आडे आपल्या प्राणांची आहुती देऊन उपोषण करत आहे. त्याची तब्येत खालावत चालली आहे, पण हे निर्जीव सरकार अजूनही बहिरं आणि आंधळं झालं आहे. जिल्हा पातळीवर बंजारा समाजाने लढा पेटवला आहे, तरीही राज्यकर्त्यांच्या मनात किंचितही जाग नाही.

मराठा समाज आमचे बांधव आहेत. त्यांनाही आरक्षणाची तितकीच आवश्यकता आहे. हैद्राबाद गॅजेट्सनुसार त्यांना कुणबी प्रमाणपत्र देऊन आरक्षणाचा मार्ग खुला करण्यात आला आहे. आम्ही त्यांचे स्वागत करतो! पण प्रश्न असा आहे ,जर मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळू शकतं, तर बंजारा समाजाला हैद्राबाद गॅजेट्सनुसार एस.टी. आरक्षण का मिळू नये?

हा सरळसरळ भेदभाव आहे. आम्हाला न्याय नाकारला जातोय, आणि हा अन्याय आता सहन केला जाणार नाही!

“आमचा हक्क द्या, नाहीतर गादी सोडा!”

“बंजारा समाज उठला आहे, हक्कासाठी झुंजला आहे!”

“मराठ्यांचा हक्क आम्ही मानतो,पण आमचा हक्क का नाकारतो?”

“हैद्राबाद गॅजेट्स आमचा पुरावा ,सरकार का करते आमचा अनादर?”

“उपोषणाचा आवाज ,आंदोलनाची सुरुवात!”

आज वेळ आली आहे, गावोगावी, जिल्हाजिल्ह्यात, राज्यभर प्रचंड आंदोलन पेटवण्याची.

सरकार जर बहिरं असेल, तर आपण दणक्यात आवाज उठवूया.

सरकार जर आंधळं असेल, तर आपण लाखोंच्या मोर्चाने त्यांना दाखवूया.

-आमचा संदेश स्पष्ट आहे:

बंजारा समाजाला एस.टी. आरक्षण मिळालंच पाहिजे!

हे आमचं स्वप्न नाही,हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे!



**श्री. चव्हाण पृथ्वीराज दिलीप**
(इलेक्ट्रॉनिक्स अँड कम्प्युटर सायन्स इंजिनियर, मुंबई)
रा. रुपचंद नगर
तालुका रेनापुर
जिल्हा लातूर

# माजलगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा



माजलगाव / प्रतिनिधी :- अर्जुन सुदर्शन भैय्या साळुंके यांची थायलंड येथे होणाऱ्या अंतरराष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेत निवड झाल्याबद्दल त्यांचे माजलगाव तालुक्याच्या वतीने हार्दिक हार्दिक अभिनंदन केले अर्जुन हा उच्च न्यायालय संभाजीनगर येथील नामवंत वकील एडवोकेट सुदर्शन जीवनराव साळुंके यांचे चिरंजीव आहेत अतिशय कटाक्षाने त्यांची ही मेहनत चालू आहे नक्कीच येत्या काळामध्ये ते आपल्या गावाचे,तालुक्याचे,जिल्ह्याचे, महाराष्ट्राचे, व देशाचे नाव रोशन केल्याशिवाय राहणार नाहीत अशी अपेक्षा सर्व माजलगाव तालुका करांच्या वतीने करत आहोत शुभेच्छुक कॉम्रेड.कृष्णा पा सोळंके किसान सभा तालुका अध्यक्ष माजलगाव

# माझी जन्मकुंडली आणि वक्री आलेला मनुष्य गण!



**डॉ. दशरथ भोसले**
**विनोदी कथा लेखक, दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

डॉ. दशरथ भोसले

जन्मकुंडली, पत्रिका, गुण–गण यांचा गोंधळ हा आपल्या समाजातील चिरकालीन विषय. लग्न ठरवताना गुण जुळतात की नाही, देव गण आहे की राक्षस गण, हे बघताना अनेक वेळा खरे आयुष्य हातातून निसटते. या सगळ्या गमतीजमतीतून निर्माण होणारे प्रसंग मात्र कधी हास्यविनोद तर कधी विचार करायला लावणारे असतात. अशाच एका तरुणाची ही कथा, ज्याच्या “मनुष्य गणामुळे” दोन लग्नं मोडली आणि पुढे त्याने अनुभवलेले हलके–फुलके प्रसंग.

कथा:

मी जुनी अकरावी, म्हणजे मॅट्रिकची परीक्षा 1965 ला पास झालो. दुसऱ्या दिवशी वडिलांच्या ओळखीने ट्रेनी जॉब इन्स्पेक्टर म्हणून नोकरीला लागलो. पुढे त्याच कंपनीत जॉब इन्स्पेक्टर म्हणून नोकरीवर रुजू झालो. मग वडिलांनी तालमीत जाऊन व्यायाम करायला लावले. घरी योग्य खुराक मिळत गेला. दोन वर्षांत तालीम करून छान तब्येत झाली होती. मी घरातला थोरला मुलगा. मुलाला वीसावे वर्ष लागले. मुलाचे हात पिवळे करायला पाहिजेत. समाजातील काही मध्यस्थांना सांगून वडिलांनी माझ्यासाठी वधू संशोधन सुरु केले. नाही म्हटले तरी मलाही लग्न करावेसे वाटू लागले.

पहिलेच स्थळ आले. हडपसरमधील एका निवृत्त अधिकाऱ्याच्या मुलीचे. मुलीचे वडील म्हणजे कस्टम ऑफिसमधील निवृत्त श्री. सुभानराव साळुंखे. मुलीचे वडील बाहेरगावाहून चार दिवसांनी आले की, माझे आईवडील मुलगी पाहायला जाणार होते. मी बाबुराव अर्नाळकरांच्या डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचायचो. माझ्यातला हेर जागा झाला. मुलीची माहिती मिळवायची. जमले तर मुलीला तिच्या नकळत बघायचे. प्लॅन ठरला. फॅक्टरीत माझे काही मित्र हडपसरला राहणारे होते. सुदैवाने प्रस्तावित मुलीच्या घरासमोरच मित्राचे घर होते. माहिती मिळाली – मुलगी जिचे नाव विमल साळुंखे. संध्याकाळी सहा वाजता शेजारील टायपिंगच्या क्लासला जाते. चार वाजता फॅक्टरीतून डायरेक्ट मित्राच्या घरी. प्रतिक्षा संपली. बरोबर पावणे सहा विमल साळुंखे घराबाहेर पडली. मग मी टायपिंग इन्स्टिट्यूटमध्ये गेलो. उगाच चौकशी सुरु केली – मला मराठी टायपिंग शिकायचे आहे, त्यानंतर इंग्रजी टायपिंग शिकायचे आहे. परीक्षा किती दिवसांनी होतात, फी किती आहे याची माहिती संचालक देत होते. माझा तो बहाणा होता. मात्र लक्ष त्या विमल साळुंखे मुलीकडे होते. मी संचालकांना विनंती केली – मला इन्स्टिट्यूट दाखवाल का? त्यांनी सगळी इन्स्टिट्यूट फिरुन दाखवली. हाल्डा कंपनी, गोदरेज कंपनीचे टाईपरायटर दाखवले. मला विमल जवळून बघायला मिळाली. मी “उद्या येतो” सांगून मित्राबरोबर बाहेर पडलो. मित्राला म्हणालो, “अरे मित्रा, पोरगी एकदम नक्षत्रासारखी चिकनी आहे.” आता देवाचा धावा करत, स्वप्नं रंगवत घरी आलो. चार दिवसांनी आईवडील मुलगी बघायला गेले. वडिलांची एकच अट – पत्रिका जुळल्यावर पुढील बोलणी. नको तेच झाले. पत्रिका जुळत नाही. मुलाचा ‘मनुष्य गण’ आहे आणि मुलीचा ‘राक्षस गण’ आहे.

असेच पाच–सहा महिने गेले. परत एका मुलीचे स्थळ आले. विश्रांतवाडी येथील सुभेदार नानबाराव पवार यांची कन्या. आईवडील मुलगी बघायला गेले. सुभेदार साहेबांची एकुलती एक मुलगी. सुभेदार वडिलांना म्हणाले, “दाजीराव, तुमचा थोरला मुलगा आमचा घरजावई करू. माझे जे आहे ते सर्व माझ्या एकुलत्या एक मुलीचेच आहे. मुलाला मी पाहिलेले आहे. मुलीनेही मुलाला पाहिले आहे. दोघांची पसंती आहे.” आमच्या वडिलांमधील ‘जमदग्नी’ जागा झाला. वडील म्हणाले, “सुभेदार साहेब, मला सांगा, माझा मुलगा इथे येतो?” सुभेदार साहेब हसले. वडिलांना म्हणाले, “दाजीराव, जरा शांत व्हा. मी मुलीचा बाप आहे. माझ्या मुलीसाठी एखादा होतकरु तरुण मुलाच्या शोधात मी नेहमी असतो. मागच्या महिन्यात उद्यान प्रसाद मंगल कार्यालयात मुलीला घेऊन पुतण्या आणि मी लग्नाला गेलो होतो. तुमचा मुलगा माझ्या पुतण्याचा मित्र आहे. माझ्या पुतण्याने तुमच्या मुलाची आमच्या फॅमिलीसोबत ओळख करून दिली. तुमचा मुलगा आणि माझी मुलगी दोघे एकमेकांकडे बघून हसली. या चाणक्य सुभेदाराच्या नजरेने हेरले. सुभेदार साहेबांनी सांगून टाकले – मुलगा पसंत आहे.” माझ्या आईवडिलांनाही मुलगी पसंत होती. दुसऱ्या दिवशी जन्मपत्रिका पाहिली. माझा ‘मनुष्य गण’ आडवा आला.

आता मात्र मी मनातून खूप चिडलो होतो. एका जन्मकुंडली करून देणाऱ्या गुरुजींना भेटलो. मला ‘मनुष्य गण’ असल्याने माझी दोन लग्नं मोडली. पत्रिकेत कोणता ‘गण’ पॉवरफुल असतो? ते म्हणाले, “देव गण एकदम पॉवरफुल. देव गणाच्या मुलाला ‘राक्षस गण’, ‘मनुष्य गण’ची मुलगी चालते.” माझी असहायता बघून गुरुजी म्हणाले, “तू शंभर रुपये दिलेस तर देव गणाची पत्रिका बनवून देतो.” मलाही क्षणभर अशी पत्रिका बनवून घेण्याचा मोह झाला. पण आईवडील दोघेही सुशिक्षित – तो नाद सोडून दिला.

एके रविवारी आमच्या शाळेतील ज्योतिषशास्त्राचा अभ्यास असणाऱ्या श्री. गाडगीळ सरांच्या घरी गेलो. मी त्यांचा आवडता विद्यार्थी. मला ते डी.डी. म्हणून ओळखायचे. थोड्याशा अवांतर गप्पा झाल्यावर मूळ मुद्द्याला हात घातला.

मी विचारले – “सर, आकाशातील हजारो मैल दूर असणारे हे ग्रह मानवाच्या जीवनावर परिणाम करतात. बरे, हे ग्रह हिंदू मुला–मुलींच्या पत्रिकेत का प्रभाव पाडतात? हे ग्रह पारशी, ख्रिश्चन, मुस्लीम जमातींवर प्रभाव टाकत नाहीत? आणि त्या सगळ्या ग्रहांना आम्ही हिंदूच दिसतो का? आम्ही सहिष्णू म्हणून हे आकाशातले ग्रह आमच्याच बोकांडी का बसतात?”

सरांनी माझा त्रागा ओळखला. सर म्हणाले – “डी.डी., तुला एक किस्सा सांगतो. आपल्या शाळेत सन 1951 साली श्री. गजानन श्रीराम केळकर सर होते. त्यांची एकच अट होती – ज्या मुलीशी माझ्या पत्रिकेचे छत्तीस गुण जुळतील त्या मुलीशीच मी लग्न करणार. छत्तीस गुणांची पत्रिका जुळता–जुळता सरांचे वय कधी छत्तीस झाले ते कळलेच नाही.

एकदाची छत्तीस गुणांची पत्रिका जुळली. कर्वे आडनाव, मुलगी पदवीधर, गौरवर्ण. मुलगी मुंबईची. लग्न ठरले. लग्नाच्या आदल्या दिवशी दादरला मुलाकडील मंडळी पोचली. चाळीच्या खाली छानसा मंडप घातला होता. वरपक्षाकडील वऱ्हाडी मंडळीचे चांगलेच आगत–स्वागत झाले. रात्री मेहंदीचा कार्यक्रम झाला. चाळीतील दोन खोल्या वरपक्षातील वऱ्हाडी मंडळींना दिल्या होत्या.

लग्नाचा मुहूर्त दुपारी बारा वाजून पस्तीस मिनिटांचा होता. सकाळी नऊ वाजता हळदीचा कार्यक्रम झाला. मुलाची उष्टी हळद मुलीला लावण्यात आली. केळकर कुटुंबातील महिलांना मुलगी खूपच आवडली. लग्नाची धामधूम सुरु होती. एवढ्यात केळकरांच्या घरातील काही मुले ओरडत आली – “नवरी मुलगी मोठमोठ्याने ओरडून नाच करीत आहे.”

केळकरांकडील काही महिला बघायला गेल्या. बघतात तर काय – मुलीने केस मोकळे सोडलेले, जोरजोरात ओरडत अंगविक्षेप करीत आहे. मुलीकडील महिला तिला सावरायचा प्रयत्न करीत होत्या. तिच्यात राक्षसी ताकद संचारली होती. ती कोणालाच आवरत नव्हती. मुलाकडील लोकांनी मुलीच्या वडिलांना बोलावले आणि चांगले खडसावले.

मुलीचे वडील रडू लागले. काय झाले ते त्यांनी सांगितले. मुलगी पदवीधर झाली. अचानक मुलगी वेड्यासारखी वागू लागली. शेवटी मुलीला मेंटल हॉस्पिटलला ठेवली. दोन वर्षांनंतर ती नॉर्मल झाली. आम्हाला आनंद झाला. एक वर्षभर मुलगी एकदम नॉर्मल पहिल्यासारखी वागू लागली. आम्ही लग्न ठरवले. आज तिच्या अंगाला हळद लागली आणि पुन्हा ती वेड्यासारखी वागू लागली.

मुलीचे वडील पाया पडून माफी मागत होते. “खर्च भरून देतो” म्हणत होते. मुलाकडील सर्वांनी मिळेल त्या वाहनाने पुणे गाठले. मुलाने सांगितले – “मला आता पत्रिका बघायची नाही. मिळेल त्या मुलीशी लग्नास तयार आहे.”

योगायोगाने तिशी उलटलेल्या मुलगीचा शोध लागला. आठवड्यात लग्न झाले. ना पत्रिका पाहिली, ना लग्नाचा मुहूर्त पाहिला. लग्न लागले. यथावकाश मुले झाली. त्यांचा सुखाचा संसार सुरु आहे.

सरांनी मला सांगितले – “तु काय तो निर्णय घे.” मी कसला निर्णय घेणार? आईवडिलांचा पत्रिकेवर विश्वास.

पत्रिकेविना माझे लग्न जुळावे, आईवडिलांना सुबुद्धी मिळावी, यासाठी मी दिसला ‘देव’ की नवस केला. पत्रिका न बघता माझे लग्न जुळावे म्हणून मी नवस केला. निमंत्रण नसतानाही पूजेला गेलो, प्रसाद घेतला, नवस केला. सगळे देव झाले. मग बुवा, साधूसंत यांचे आशीर्वाद घेतले. मनात मागणे मागितले. या जन्मपत्रिकेच्या जंजाळातून मला सोडव आणि एकदाचे माझे दोनाचे चार हात होऊ दे अशी मनापासून प्रार्थना केली.

माझे नशीब फळफळले. सर्व देव, देवी, साधूसंत, बुवा मला पावले. पत्रिका नसलेल्या मुलीशी माझे लग्न झाले. आमचा सुखाचा संसार सुरु आहे.

पुढे मला राजकारणात यश येईल का या विचाराने एका वेदशास्त्र संपन्न भटजीकडे गेलो. त्यांनी माझा ‘देव गण, सिंह रास’ असलेली पत्रिका करुन दिली आणि छातीठोकपणे “ही पत्रिका खरी आहे” याची शाश्वती दिली. क्षणभर ‘मनुष्य गण, मीन रास’ पत्रिका तयार करुन देणाऱ्या गुरुजींबद्दल मनात कटुता आली.

लग्न जुळत नसताना आई म्हणायची – “तुझे लग्न होईल. लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात.” हे मला आता पटले.

तात्पर्य:

पत्रिका, गण, गुण हे सगळं असलं तरी खरी जुळवाजुळव मनांची असते. लग्नाच्या गाठी खरोखरच स्वर्गात बांधल्या जातात; आणि त्या देव, देवी, साधूसंत यांच्या आशीर्वादाने यशस्वी होतात. आयुष्यात सुखी संसारासाठी गण–गुणांपेक्षा परस्पर समजूत, विश्वास आणि प्रेम महत्त्वाचे असते.

# कासारी ( बो ) शालेय व्यावस्थापन समितिच्या अध्यक्ष पदी - राजु ताजोदिन सय्यद व उप - अध्यक्ष पदी श्री प्रकाश सिद्राम सोणवने यांचि निवड



धारुर ( बाबुराव तिडके )

धारुर तालुक्यातील कासारी ( बो ) येथिल जि प प्रा शाळेतील एक वर्षाच्या कालखंडा नंतर ठरल्या प्रमाणे अध्यक्ष व उप अध्यक्षांच्या निवडी करण्यात आल्या पहिल्या अध्यक्षांचा एक वर्षाचा कालखंड संपताच पुढील एक वर्षा करिता शाळेच्या अध्यक्ष पदी - राजु ताजोदिन सय्यद तर उप - अध्यक्ष पदी श्री प्रकाश सिद्राम सोणवने यांच्या शाळेये मुख्याध्यापक सह सदस्या मधुन खेळीमेळीच्या आनंदाच्या वातावरणामध्ये पार पडल्या निवडी झाहीर होताच अध्यक्ष व उप - अध्यक्षांचा आप आपल्या कार्यकर्त्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या या प्रसंगी शालेय व्यावस्थापण समितीचे सदस्य श्री कृष्णा बाबासाहेब बडे सौ आश्विणी बाळासाहेब बडे सौ भाग्यश्री विलास बडे सौ पुजा बंडोपंथ उघडे श्री जालिंदर नवनाथ आडे - चाँदपाशा आश्रफ सय्यद - बुशेरा हबीब सय्यद हे उपस्थित होते शाळेची प्रगती करण्यासाठी आम्ही सर्व जन मिळून एकोप्याने काम करु असे अध्यक्ष - उप - अध्यक्ष - सह - सर्व सदस्य आपले मनोगत व्यक्त करत होते .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

सोडले तर सगळे मराठा आहेत. राज्य सरकारच्या कमिट्या कधी एका समाजाच्या करायच्या नसतात, असे शरद पवार यांनी सांगितले.

---

आरक्षण आम्ही आणले. त्यामुळे ओबीसींचं हित पाहणारं कोण आहे ते ओबीसींना चांगलं समजते, असेही फडणवीस (Devendra fadnavis) म्हणाले.येत्या काळात ज्यांच्याकडे कुणबी नोंदीचे प्रमाणपत्र आहे, त्यांनाच ओबीसींचे आरक्षण मिळणार आहे. त्यामुळे दोन्ही समाजातील नेत्यांनाही खरी वास्तविकता प्रत्येकापर्यंत पोहचवावे, विरोधकांना केवळ राजकारण करता येते, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.पुण्यात टोळीयुद्ध नाही आपआपली शत्रुता असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. आरक्षणाच्या प्रशानावरुन विरोधी पक्षाने राजकारण करु नये, असा मोलचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. त्यासोबतच ज्येष्ठ नेते शरद पवार कशासाठी प्रसिद्ध आहेत हे सर्वांना माहित असल्याचे सांगत फारसे बोलणे टाळले.

---

तो जामीनावर बाहेर आला आहे.बीड पोलिसांनी शेख नवीद शेख चाँदला अटक केली होती. या कारवाईनंतर त्याने हायकोर्टात जामीनासाठी अर्ज केला होता. त्याला दोन दिवसांपूर्वी जामीन मंजूर झाला. यानंतर तो बाहेर आल्यानंतर काल सायंकाळी 5 वाजता बीड शहरातील मोमीनपुरा भागात फटाक्यांची आतिषबाजी करत त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी लहान-लहान मुलांच्या हातांमध्ये स्प्रे देऊन ते उडवायला लावले तर काहींना रंग उधळायला लावला. अशा पद्धतीने एका गुंडाचं भर रस्त्यावर मोठ्या थाटात स्वागत केलं जात होतं.शेख नवीद शेख चाँदच्या स्वागतामुळे रस्त्यावर वाहतूकीला अडथळा निर्माण झाला होता. याच वाहतूक कोंडीत एक रुग्णवाहिका अडकली होती. या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी रुग्णवाहिकेला बराच वेळ लागला. बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई आदेश लागू केलेले आहेत त्याचंही या गुंडाने उल्लंघन केलं. या संपूर्ण प्रकरणाचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामुळे आता नागरिकांनी त्याच्यावर कारवाईची मागणी केली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार शेख नवीदने एका महिलेला मारहाण केली होती. याप्रकरणी त्याच्यावर कारवाई करण्यात आली होती. आता फिर्यादी महिलेने आपल्या घरासमोरुन त्याने रॅली काढली असे म्हणत अशा व्यक्तीवर आता कारवाई करावी अशी मागणी केली आहे. त्यानंतर आता आम्ही सदरील गुंडावर आणि लोकांवर कारवाई करणार असल्याची माहिती पेठ बीड पोलीस स्टेशनचे अधिकारी अशोक मुदीराज यांनी दिली आहे.

---

प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीला तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा अरुण पवार, बाळासाहेब (पप्पू) चव्हाण,कॉ पांडुरंग राठोड, साहेबराव चव्हाण, वसंत राठोड, सरपंच विनायक राठोड, पत्रकार प्रकाश चव्हाण आदींनी मोर्चाची रुपरेषा मांडली. तसेच मोर्चा शांततेत व शिस्तीत निघावा यासाठी आपण प्रयत्न करावे, निघताणाच स्वतः जेवन व पाणी बॉटल सोबत घ्यावे, यावेळी माजी नगरसेवक प्रभाकर राठोड यांनी मोर्चासाठी लागणारे 5000 झेंडे स्वखर्चाने दिले. यावेळी डि एस राठोड, रामाजी जाधव, परसराम पवार, दिलीप राठोड, रमेश पवार आदींसह युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चात तालुक्यातील हजारो समाजबांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन सकल बंजारा समाज बांधवांनी केले आहे

---

राठोड, काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई तालुका अध्यक्ष प्रकाश मुंडे,विधानसभा अध्यक्ष रणजित देशमुख,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बाबा शिंदे,उत्तम माने,एच. यु.फड,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख भोजराज पालीवाल,विधानसभा प्रमुख जगन्नाथ साळुंखे,अदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

---

लग्न आता आमच्या मुलासोबत लावा या विधानाने बीड जिल्ह्यातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. रविवारी(ता.14) तलवाडा पोलीस ठाण्यात हाकेच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल केला असून, या शिवाय गेवराई पोलिस ठाण्यात देखील मराठा समाज हाकेंच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी एकवटला होता. याबाबतचे निवेदन गेवराई पोलीसांना दिले आहे. दरम्यान, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याचा निर्णय सरकारने घेतला असल्याने ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. या विरोधात लक्ष्मण हाके हे देखील रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी गेवराईच्या बागपिंपळगावात परवानगी न घेता समाज जमावल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल असताना श्रृंगारवाडीत मराठा समाज आणि मराठा मुलीबद्दल वादग्रस्त विधान केल्याने गेवराईतील मराठा समाज आक्रमक झाला आहे.यावरुन रविवार तलवाडा पोलीस ठाण्यात प्रा.हाके यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ठिकठिकाणचे मराठा समाजाने हाके यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात एकवटला आहे.

---

आहे. या मोर्चाचे नेतृत्व समाज करणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच समाज बांधवांनी प्रत्येक घरातील महिला व पुरुषांनी सहभागी होऊन बंजारा समाजाची ताकद मोर्चामुळे दिसणार आहे. आंध्रप्रदेश व तेलंगणा राज्या प्रमाणेच महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी निघणाऱ्या मोर्चात बंजारा समाज बांधवांनी पारंपरिक वेशभूषेत हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेचे बीड जिल्हाध्यक्ष बाळासाहेब (पप्पु) चव्हाण यांनी केले आहे.

---

समाजाच्या हक्कांचा दस्तऐवज असून त्यानुसार बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती प्रवर्गात समावेश व्हावा, ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. केंद्र आणि राज्य सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, या मागणीसाठी हा मोर्चा काढण्यात येत आहे.मोर्चादरम्यान जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन समाजाच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी करण्यात येणार आहे. या लढ्याला न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहणार असल्याचा इशाराही यावेळी देण्यात येईल."बंजारा समाज हा देशाच्या विकासात मोलाचा वाटा उचलणारा समाज आहे. मात्र आरक्षणाच्या प्रश्नावर समाजाला अन्याय सहन करावा लागत आहे. आता हा अन्याय सहन केला जाणार नाही. समाजातील प्रत्येक बंधू-भगिनीने या मोर्चात सहभागी होऊन आपल्या हक्काचा आवाज बुलंद करावा," असे आवाहन शरदभाऊ राठोड यांनी समाजबांधवांना केले आहे.आज होणारा हा मोर्चा केवळ बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील बंजारा समाजासाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचेही शरदभाऊ राठोड यांनी यावेळी सांगीतले.

---

सुरेश धस (Suresh Dhas) यांनी दिला.ओबीसीचे नेते प्रा. लक्ष्मण हाके (Laxman Hake) यांनी आक्रस्ताळेपणा कमी करुन बुद्धिवाद्यांप्रमाणे आपली मते मांडवीत. दांडके घेण्याची भाषा, तुला बघून घेईन असे, म्हणणे चुकीचे आहे. विधानसभा निवडणुकीत तुम्ही सगळ्या मतदारसंघात फिरलात, गेवराईमध्ये तुमची मते त्यांच्या झोळीत टाकली मग आता विजयसिंह पंडित यांच्या विरोधात दांडुक्याची भाषा कशाला? असा सवालही हाकेंना केला.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासंदर्भात हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा घेतलेला निर्णय विचारपूर्वक आणि कोणत्याही समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या निर्णयाचा प्रत्यक्षात काय परिणाम होतो? किती कुणबी नोंदी सापडतात? किती लोकांना लाभ होतो हे अद्याप स्पष्ट झालेली नाही.असे असताना राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर अविश्वास दाखवायचा आणि आमचे आरक्षण संपले असे म्हणत दोन्ही बाजूंनी टोकाची भूमिका घेणे चुकीचे आहे. यातून दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होत आहे, अशावेळी माझे दोन्ही समाजाच्या नेत्यांना आवाहन आहे की त्यांनी 'वेट अँड वॉच'ची भूमिका स्वीकारावी. लक्ष्मण हाके यांनी मराठा महिलांविषयी केलेल्या वक्तव्याबद्दलही सुरेश धस यांनी नाराजी व्यक्त केली.

---

## पान 4 वरुन

कंप्युटिंग यांसारख्या नवीन तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन नवीन क्रांती घडवून आणण्याचे आवाहन केले.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नवीन 11 मजली इमारतीच्या उद्घाटनाबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांनी सीओईपी आणि आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त संशोधन उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण मिळेल, असे सांगितले. शिक्षण संस्थांसाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) निधीचा वापर करण्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांना सुचवले, जेणेकरुन प्राध्यापक भरतीतील आर्थिक अडचणी कमी होतील. त्यांनी सीओईपी कॅम्पसमध्ये आयआयटीचा कॅम्पस सुरु करण्याच्या विषयावरही चर्चा केली.सीओईपी अल्युमिनी असोसिएशनचे अध्यक्ष भरत गीते यांनी माजी विद्यार्थी संघटनेचा विस्तार जपान, अमेरिका आणि युरोपमध्ये झाल्याचे सांगितले. दिवंगत माजी विद्यार्थिनी गौरी शहा यांनी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग इमारतीसाठी ₹6 कोटी रुपयांची देणगी दिल्याचे त्यांनी आदराने नमूद केले. तसेच, तत्कालीन अर्थमंत्री अजित पवार यांच्या योगदानालाही त्यांनी उजाळा दिला. त्यांनी 2027 पर्यंत सीओईपीची रँकिंग सुधारण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. गीते यांनी ऑगस्ट 2028 मध्ये संस्थेची 175 वर्षे आणि 'रेगाटा' कार्यक्रमाची 100 वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, या सोहळ्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांकडे केली.या सोहळ्यात विविध क्षेत्रांत जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्यांना 33 वा 'अभिमान पुरस्कार 2025' प्रदान करण्यात आला. तसेच, दिवंगत माजी विद्यार्थिनी गौरी शहा यांच्या कुटुंबाने दिलेल्या ₹6 कोटींच्या देणगीतून संगणक अभियांत्रिकी इमारत उभारल्याची माहिती देण्यात आली. माजी विद्यार्थी आशिष अचलेरकर यांनी शैक्षणिक कार्यासाठी ₹8 कोटींचा निधी दिल्याचेही जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमाला सीओईपीचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

---

अशी भावनिक प्रतिक्रिया आत्महत्या करणाऱ्या देऊळकर यांच्या मुलीने दिली आहे. सरकारने तात्काळ दखल घेतली पाहिजे अशी मागणी केली आहे.घरातील कर्ता पुरुष गेल्यानं कुटुंबाचे हाल होतील, अशी हळहळ कुटुंबियांनी व्यक्त केली आहे. आता इथून पुढे आमची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होताना दिसतो. 'माझे वडील गेले पण, आमची जबाबदारी कोण घेणार?', असा भावनिक सवाल गोरक्षक देवडकर यांच्या मुलीनं केला आहे. सरकारने यावर लवकरात लवकर दखल घ्यावी अशी, मागणी तिने केली आहे.

---

विवंचनेतून या व्यक्तीने आत्महत्येचं पाऊल उचलल्याचं त्यांच्या कुटुंबाने सांगितले. गोरख देवडकर यांना पाच मुली असून दोन मुली पोलीस भरतीची तयारी करत आहेत. मात्र सध्या राज्यातील आरक्षणाची स्थिती पाहता मुलीच्या शिक्षणाचे कसे होईल? असा प्रश्न त्यांना सतावत होता. याच विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केली. जिल्हा रुग्णालयात देवडकर यांचा मृतदेहाचे शवविच्छेदन सुरु असून राज्य सरकारने आमच्या कुटुंबाचा विचार करावा अशी मागणी पीडित कुटुंबाने केली आहे.आपल्या वडिलांच्या आत्महत्या नंतर त्यांच्या मुलीने सांगितले, जेव्हापासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण दिलं तेव्हापासून माझे वडील सातत्याने चिंतेत होते. कारण त्यांना माझ्या नोकरीची जास्त चिंता होती. त्यांनी मजुरी करून आमच्या नोकऱ्यांसाठी पैसा लावलाय. आधीच ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा आहे. आता त्यामध्येच मराठा समाज आला आहे. आपल्या मुलींचा कसं होईल? असं ते सतत मला बोलायचे. या चिंतेतून त्यांनी असं टोकाचे पाऊल उचललं. हे सांगताना मुलीच्या डोळ्यात अश्रू थांबत नव्हते. वडील मजुरी करायचे जे मिळेल ते काम करायचे. मुलींची आई ही मजुरी करते. तीन बहिणींचे लग्न झाले आहेत. दोघी बहिणी पोलीस भरतीची तयारी करत आहेत.देवडकर यांच्या आत्महत्येमुळे संपूर्ण कुटुंब हादरून गेलं आहे. घटनेनंतर गोरख देवडकर यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आलं. सध्या त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन सुरु आहे. या आत्महत्येची माहिती समजताच नाथापूरसह परिसरात शोककळा पसरली आहे.

---

शोभा मुंडे या आपले पती तुकाराम मुंडे व मुलांसह राहत होत्या. मात्र पती-पत्नीमध्ये नेहमीच वाद होत असायचे. या अनुषंगाने यापूर्वीही या महिलेने आपल्या पतविरुद्ध पोलिसात धाव घेतलेली होती. त्यानंतर सामंजस्याने पती-पत्नीतील वाद नातेवाईकांनी मिटवले होते. त्यानंतर ते सुखाने संसार करत होते. मात्र गेल्या काही महिन्यांत त्यांच्यात पुन्हा वाद सुरु झाले व पुन्हा पहिल्यासारखीच वादावादी सुरु झाले. या वादातूनच रागाच्या भरात आरोपी पती तुकाराम मुंडे याने धारदार सुरा पोटात खूपसून शोभा हिची हत्या केली आणि घरातून निघून गेला. पती गायब असल्याने प्रथमदर्शनी त्याने तिची हत्या केल्याचा कयास बांधला जात होता. या दृष्टीने पोलिसांनी तातडीने शोध घेतला व रात्री उशिरा आरोपीला परभणी येथून अटक केली आहे. याप्रकरणी मयत महिलेच्या मुलाने फिर्याद दाखल केली असुन अधिक तपास परळी ग्रामीण पोलीस करीत आहेत.

---

राजभाषा असून, तिची लिपी देवनागरी असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.1918 मध्ये गांधीजींनी हिंदी साहित्य संमेलनात हिंदीला राजभाषा बनवण्याची मागणी केली होती. गांधीजींनी तिला जनमाणसाची भाषाही म्हटले आहे. सन 1949 मध्ये, स्वतंत्र भारताच्या अधिकृत भाषेच्या प्रश्नावर बराच विचारविनिमय केल्यानंतर, 14 सप्टेंबर 1949 रोजी हा निर्णय घेण्यात आला, ज्याचे भारतीय राज्यघटनेच्या 17 व्या अध्यायातील कलम 343(1) मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केले आहे. संघाची अधिकृत भाषा हिंदी आणि लिपी देवनागरी असेल. संघाच्या अधिकृत हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या अंकांचे स्वरुप आंतरराष्ट्रीय स्वरुप असेल.हा निर्णय 14 सप्टेंबर रोजी घेण्यात आला, हा दिवस हिंदी राष्ट्रभाषा म्हणून तिची निवड करुन अमलात आणल्यावर अहिंदी भाषिक राज्यातील लोकांनी विरोध सुरु केला आणि इंग्रजीलाही राजभाषेचा दर्जा द्यावा लागला. त्यामुळे हिंदीवरही इंग्रजी भाषेचा प्रभाव पडू लागला. हिंदी भाषा हिंदी हिंदी आमचा आत्मा आहे तिचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे व आपल्या भारतीय संस्कृतीचे व एकतेचे प्रतीक आहे." या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री गंडले सर तर आभार श्री गोपणपाळे सर यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

---

तर महापुरुष जयंती, पुण्यतिथी देखिल साज-या केल्या जातात. उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या व्दितीय वाढदिवसानिमीत्त हार, तुरे, केक व इतर खर्चाला फाटा घेत गावातील सर्व ग्रामस्थांकरिता आयुष्यमान कार्ड काढण्याकरिता ऑनलाईन कॅम्प घेवुन ग्रामस्थांना तात्काळ कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचेसह विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, श्याम कांबळे, शरद कांबळे, यवराज कांबळे, प्रविण कांबळे, अविनाश कांबळे, तात्यासाहेब कांबळे, सागर कांबळे, सिध्देश्वर कांबळे, मयूर कांबळे यांचेसह ग्रामस्थांची उपस्थिती होती. दरम्यान आयुष्यमान कार्ड मिळाल्यामुळे ग्रामस्थांच्या चेह-यावर समाधान दिसुन आले तर त्यांना मिळालेल्या आयुष्यमान कार्डमुळे उपचार मिळणे सोपे झाले आहे.

---

तालुक्यातील कुंडलिका नदीवर असलेला अप्पर कुंडलिका प्रकल्प या वर्षी लवकरच भरलेला आहे.हे धरण ओसंडून वाहत असल्यामुळे या धरणाचे पाणी कालव्याद्वारे मामला चिंचोटी आणि तीगाव येथील तलावामध्ये सोडण्यात यावे अशी मागणी अॅड राज पाटील यांनी पाटबंधारे विभागाकडे अनेक वेळा केली होती. याबाबत पाणी सोडले नाही तर 17 सप्टेंबर पासून उपोषण करण्यात येईल असा इशारा देखील दिला होता. राज पाटील यांनी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांच्या कडे देखील निवेदन देऊन याबाबत पाठपुरावा करण्याची विनंती केली होती. आमदार प्रकाश सोळंके यांनी राज पाटील यांना पाणी सोडण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रकाशदादांनी प्रशासकीय पातळीवर दूरध्वनी करुन आणि पत्रव्यवहार करून पाठपुरावा केला. त्यामुळे दिनांक 12 सप्टेंबर रोजी अप्पर कुंडलिका धरणाचे पाणी मामला आणि चिंचोटी धरणात सोडण्यात आले. तीगाव धरणात देखील पाणी सोडण्यात येणार आहे. राज पाटील यांनी ही मागणी लावून धरल्यामुळे आणि प्रकाश सोळंके यांनी या मागणीचा पाठपुरावा केल्यामुळे प्रशासनाने हे पाणी सोडले आहे. त्यामुळे जनतेमधून अॅड राज पाटील आणि आमदार प्रकाश सोळंके यांचे आभार मानले जात आहेत.

---

समाज बांधवांनी या विराट महामोर्चात लाखोच्या संख्येने उपस्थित रहावे असे आव्हान बंजारा पँथरचे अध्यक्ष रोहिदास पवार यांनी केले आहे.

सन 1728 ते 17 सप्टेंबर 1948 या निजाम शासनकालीत बंजारा समाज आदिवासी म्हणून वास्तव्यात राहत होता. आणि हाच निजामशाषनाने बंजारा समाजाला आदिवासी म्हणून घोषित केले होता.निजाम काळातून मराठवाडा स्वातंत्र्य झाला परंतु बंजारा समाजावर खूप मोठा अन्याय झाला अशी खंत बंजारा समाज बांधव वारंवार करत आहोत तरी राज्य शासनाने हैद्राबाद गॅजेट यानुसार बंजारा समाज बांधवांना अनुसूचित जमातीच्या आरक्षणात समाविष्ट करावा. 15 सप्टेंबरच्या महामोर्चात बीड जिल्ह्यातील बंजारा समाज लाखोच्या संख्येने उपस्थित राहील अशी माहिती बंजारा पँथर चे अध्यक्ष रोहिदास पवार यांनी पत्रकारांना दिली आहे व समाज बांधवांना आवाहन केले आहे.

---

प्रमुख स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व प्राप्त केले.

या यशस्वी कामगिरीसाठी शनिवारी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, डॉ. सुनील जोंधळे, प्राचार्य डी. डी. राऊत, प्रा. नितीन काळे, मा. अशोक तावरे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे आदी उपस्थित होते.एकांकिकेच्या स्पर्धेत आदित्य ठोंबरे यांनी प्रथम पारितोषिक मिळवले, तर ऋतुजा वाघमारे हिने बेस्ट अॅक्ट्रेसचा मान प्राप्त केला, तर रोहित गव्हाणे यांनी बेस्ट अॅक्टिंग, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि सर्वोत्तम संघगौरवाचे बक्षिस मिळवले. याशिवाय, रोहित गव्हाणे यांच्या टीमने मिमिक्री स्पर्धेत तिसरे स्थान मिळवले, तर शैला माने यांच्या टीमने रांगोळी स्पर्धेत तिसरे बक्षिस पटकावले. प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले, त्यांच्या अथक परिश्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सतत सक्रिय राहण्याचे आवाहन केले. डॉ.गजानन खेत्री, प्रा.पाठक प्राची यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अथक मेहनत व तयारी करुन या यशाची प्राप्ती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. पल्लवी जगताप यांनी मानले.

---

महाविद्यालयांच्या संघांना मागे टाकून प्रथम क्रमांक पटकाविला. या त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांनी या विजयी विद्यार्थिनींनी आपल्या महाविद्यालयाची विजयी परंपरा कायम राखल्या बद्दल विशेष अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन विजयी संघाला गौरविण्यात आले. संस्थेचे सचिव रवींद्र देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे यांनी या संपूर्ण संघाचे व सांस्कृतिक विभागाचे अभिनंदन केले. सांस्कृतिक विभागतील डॉ. अरुण चव्हाण , डॉ.पी.व्ही. गुट्टे,डॉ. संगिता कचरे व डॉ. विद्या गुळभिले यांचे मार्गदर्शन व प्रयत्न या यशामागे आहेत . या यशाबद्दल महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या विजयी चमूचे अभिनंदन केले .

---

प्रभाकर सातभाई अॅड वसंतराव फड उपाध्यक्ष अॅड दस्तगीर सचिव अॅड शेख शकीक अॅड डि.एल.उजगरे.अॅडनागापूरकर अॅड जीवनराव देशमुख अॅड अनिल मुंडे अॅड गजानन पारेकर अॅड लक्ष्मीकांत मुंडे अॅड डि.पी.कडबाने अॅड विलास बडे अॅड लक्ष्मण अघाव अॅड उषा दौंड अॅड कल्याण सटाले अॅड मार्तंड शिंदे अॅड लक्ष्मण गित्ते अॅड जगन्नाथ आंधळे अॅड ज्ञानोबा मुंडे अॅड सुनिल सोनपीर अॅड दिनकर वाघमोडे अॅड दत्ता कराड अॅड आबा सोळंके अॅड केशव अघाव अॅड अर्जुन सोळंके अॅड शाकेर सय्यद अॅड सुल्तान सहाय्यक अधीक्षक गिरीधर जोशी हाश्मी गणेश कलशेटे बडगिरे लघुलेखक सचिन गुप्ता सुंदर मुंडे अमित गजबार कृष्णा कळसदकर सचिन कळसकर जयराम गंगणे अविनाश चौधरी शेख अर्शद सह वैद्यनाथ बँकेचे वसुली अधिकारी राहुल गोपणपाळे व इतर बँकाचे अधिकारी तथा परळी पोलीस वाहतूक शाखेचे अधिकारी तथा कर्मचारी ईत्यादी यांनी सहभाग घेतला.

---

होती. पावणे व प्रमुख पाहुणे व सत्कार मूर्ती यांच्या हस्ते आदर्शांना पुष्प, पुष्प माला अर्पण करून दीप प्रज्वलन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास सेनि सहाय्यक निबंधक (सहकार) हनुमंत कांबळे, प्रा. विठ्ठलराव गाडे, प्रा. टी.जी.कांबळे, श्रीरंग डोळस, महामानव अभिवादन ग्रुपचे काशिनाथ वाघमारे, डी.एन.पोटभरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी. यु.एस वाघमारे यांनी केले तर प्रस्ताविक अँड.डी.एम.विद्यागर यांनी करुन नागसेन बुद्ध विहार धम्मिक, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा राबवीत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाप्रसंगी प्रा. डॉ.अनिता शिंदे सोबत सहकार्य म्हणून कार्य केलेले सेनि प्रा.विठ्ठल गाडे यांनी शिंदे यांच्या संदर्भात शैक्षणिक, सामाजिक व कॉलेजच्या उत्कर्षाकरिता वरिष्ठांच्या साह्याने करीत असलेल्या कामाबद्दल गौरव उद्गार काढले. व पुढील कार्यास मनोमय मंगल कामना व्यक्त केल्या. याप्रसंगी उपस्थित असलेले वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे अध्यक्ष डि.जी.वानखेडे, यांनी शुभेच्छा देते प्रसंगी सांगितले की जो पर्यंत फुले,शाहू, आंबेडकर यांच्या मानवाच्या कल्याणाच्या मार्गानुसार प्रा.डॉ.अनिता शिंदे जीवन घालवत आहेत तोपर्यंत त्यांच्या प्रगतीची वाट सुखकर होणार आहे. तथागताने सांगितल्या प्रमाणे त्यांना कुशल कर्माचे फळ त्यांना नक्कीच मिळाले व उपप्राचार्य पदाच्या जबाबदारीमध्ये वाढ झालेली आहे. त्या सर्व जबाबदाऱ्या पूर्णपणे यशस्वीरित्या पार करण्याकरिता, पुढील प्रगती करता मनोमय मंगल कामना व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास सुंदरराव तांगडे, विनोदकुमार अवसरमल, टी.बी.उजगरे, अच्युतराव उजगरे, सुनीलराव कांबळे,व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची व बालक बालिकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार ए.पी.सोनवणे यांनी व्यक्त करून सरणात्यन कार्यक्रमाची सांगता झाली.

---

विकास करण्याचा प्रयत्न करत आहोत. शाळेच्या माध्यमातून आम्ही या समाजातील एक आदर्श नागरिक घडवण्याचा प्रयत्न करत आहोत तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास करणे व त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणे हेच आमचे ध्येय आहे." असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले.

पालक सुसंवाद मेळाव्याला उपस्थित सौ. मोदाणी , सौ. रेवणवार ,सौ.देशमाने ,सौ.बेंडे ,सौ.बिडगर सौ.बनसोडे श्री भाग्यवंत श्री रंगनाथ बेंडे श्री मुंडे पालकांनी शाळेविषयी आपले मत व्यक्त केले, संस्कार शाळा ही परळी तालुक्यातील एकमेव अशी शाळा आहे जी खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कार्य करत आहे. आनंददायी शिक्षण देण्याचे व प्राथमिक पाया पक्का करून घेणारी परळी तालुक्यातील एकमेव शाळा आहे. संस्कार शाळा एक आदर्श शाळा आहे. ही शाळा आमच्या पाल्यांना शिस्तप्रिय व आदर्श घडवत आहे. संस्कार शाळा खरंच अगदी नावाप्रमाणे विद्यार्थ्यांना संस्कारक्षम घडवत आहे. इंग्रजी माध्यमातून मराठी माध्यमातून प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांची खूप छान प्रगती झाली आहे. शाळेची आवड निर्माण झाली आहे. अभ्यासाची आवड निर्माण झाली आहे. शाळेत आवडीने रोज जातात.तसेच त्यांच्यातील सुप्त गुणांना नेहमी वाव देत असते.संस्कार प्राथमिक शाळा नेहमी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व शाळांमध्ये एक पाऊल नेहमी पुढेच असते व तसे नेहमी प्रयत्न करत आहे. तसेच पालकांनी संस्कार पॅटर्नची स्वयंनिर्मित पुस्तके, अबॅकस व ऍलन अभ्यासक्रम याविषयी शाळेचे कौतुक केले. संस्कार प्राथमिक शाळा ही विद्यार्थी केंद्रबिंदू मानून, सर्व अनुभूती तुन अभ्यासक्रम व शैक्षणिक उपक्रम राबवत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व पालकांसाठी आल्पोपहारची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती.रावळ मॅडम , प्रास्ताविक खाते सर ,शालेय उपक्रम व भौतिक सुविधा माहिती ,पापुलवार सर ,आहार विषयी माहिती गोपणपाळे सर , व अबॅकस माहिती पालेवाड सर ,संस्कार पॅटर्न पुस्तक माहिती पवार सर यांनी सांगितली .तर आभार श्री.वाघमारे सर यांनी मानले यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

---

# कायद्यापुढे मॅन पावर चालतो, ना मनी पावर चालतो

ज्या घरामध्ये भरपूर युवकांची, तरुणांची आणि वयस्कर माणसांची संख्या आहे, ज्यांच्या घरातील बहुतांश सदस्य शासकीय व निमशासकीय पदावर विराजमान आहेत, भरपूर पगारीचे हक्कदार आहेत. त्यांच्याकडे भरपूर जमीन जुमला तसेच गाडी व बंगला आहे. म्हणून अशा श्रीमंत व मॅन पावर असणाऱ्या म्हणजेच पैशाने व जनशक्तीने मोठ्या असणाऱ्या घराच्या नादी लागायला गावातील माणसे घाबरतात आणि त्यांच्यासोबत वादविवाद करायला टाळतात. गावातील कोणत्याच माणसाची त्यांच्या वाटेला जायची हिंमत होत नाही. अशा सर्व बाजूंनी म्हणजेच साम, दाम, दंड, भेद यांनी भक्कम व मजबूत असणाऱ्या घराच्या नादी लागणे म्हणजे स्वतःचा पराभव करून घेण्यासारखे आहे. असे बहुतांश लोकांचे धोरण झालेले आहे. म्हणून आजकालची माणसे मॅन पावर व मनी पावर बघूनच भांडण तंटे करायला निघतात. पैशाने व जनशक्तीने समोरची पार्टी मजबूत व भक्कम असेल तर माणसे माघार घेणेच पसंत करतात. कारण त्यांना असे वाटते की, आपण जर अशा धनदांडग्या व श्रीमंत घराच्या नादी लागलो तर आपला पराभव निश्चितच आहे. आपण पोलीस स्टेशन मध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा जरी नोंद केला तरी समोरची पार्टी पैशाच्या जोरावर अटकपूर्व जामीन घेऊन सुटते. त्यांच्याकडे एकतर जनशक्ती असल्यामुळे बेदम मार खाऊन पराभव पत्करावा लागतो. कारण आजकाल ज्यांच्याकडे मॅनपावर व मनी पावर आहे त्यांचाच विजय आहे. असे आज कालच्या लोकांचे ठाम मत झाले आहे. म्हणून आजकाल ज्या घरामध्ये धनशक्ती व जनशक्तीची सांगड आहे, त्याच घराचा दरारा गावामध्ये व समाजामध्ये आहे. पण मित्रहो ज्या घरांमध्ये जनशक्ती व धनशक्ती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून तुम्ही त्या घराला जर घाबरत असाल तर तुम्ही खरंच शिक्षण शिकून न शिकल्यासारखे आहात, असेच म्हणावे लागेल. तुम्ही एवढे शिकूनही जर तुम्हाला भारतीय संविधानाचा व कायद्याचा अभ्यास नसेल तर मग तुमच्या त्या शिक्षणाला काय चुलीत घालायचे आहे? आपला भारत देश भारतीय संविधानावर चालतो. ज्याला भारतीय संविधानाचा व कायद्याचा परिपूर्ण अभ्यास आहे आणि जो भारतीय संविधान पूर्णपणे जाणतो तो कितीही मोठा वाघ असू द्या किंवा कितीही मोठा पहिलवान असू द्या, त्याला जराही न घाबरता त्याच्यासोबत कायदेशीर लढाई लढतो. ज्या माणसांना कायद्याचे नॉलेज नाही, ज्यांना कायदा म्हणजे काय आहे? हे अजूनही कळाले नाही. असे लोक मॅन पावर व मनी पावर असणाऱ्या धनशक्ती व जनशक्तीला घाबरतात. त्यांना कायद्याचे परिपूर्ण नॉलेज नसल्यामुळे आणि कायद्यातील एकंदरीत कलमा माहित नसल्यामुळे ते अशा धनदांडग्या लोकांच्या विरोधात केस करायला घाबरतात. त्यांना वाटत असते की, हे आपल्याला नंतर मारतील, गावात फिरणे व जगणे मुश्किल करतील असे त्यांना वाटत असते. ही त्यांची चुकी नसून त्यांच्या अज्ञानाची व त्यांच्या अल्पशिक्षणाची चुकी आहे. असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कारण शिक्षण शिकलेल्या माणसाला कायद्याचा थोडातरी अभ्यास असतोच. आणि त्या व्यक्तीच्या मागे भलेही मनी पावर किंवा मॅन पावर जरी नसला तरी ते पोलीस स्टेशनला, कोर्टाला व पेशा करायला कधीच घाबरत नाहीत. त्यांच्यावर अन्याय अत्याचार होत असेल, त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत असेल तर ते पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करून कोर्टात कायदेशीर लढायला लागतात आणि आरोपीला शिक्षा देण्यास भाग पाडतात. समोरच्या पार्टीकडे कितीही पैसा असू द्या पण फिर्यादी जर खंबीर व संविधानाचा अभ्यासक असेल आणि त्याला कायदा कानून माहीत असेल तर तो या लढाईत जिंकल्याशिवाय राहत नाही. कारण कायद्यापुढे ना पैसा कामाला येतो ना माणसे कामाला येतात. न्यायालयात न्यायाधीश भारतीय संविधानानुसार आरोपीला शिक्षा व अन्याय झालेल्या व्यक्तीला न्याय देऊन निर्दोष सुटका केली जाते. कोर्टात व न्यायालयात पैसा कामाला येतो ना वशिला. आपण जाणून आहोत की, कायद्याच्या कचाट्यात अडकलेले मोठमोठे महारथी जसे की, सलमान खान, संजूबाबा, अजय देवगन, आसाराम बापू आणि इतर अनेक मोठ्या हस्ती तसेच मोठमोठे राजकारणी कोट्याधीश व अब्जाधीश असून सुद्धा त्यांना जेलची हवा खावी लागत आहे. कायद्यापुढे पैसा कामाला येत असता तर ते पैशाच्या जोरावर कधीच सुटले असते परंतु कायद्यापुढे ना पैसा चालतो ना माणसे चालतात. भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे ना धनशक्ती होती ना जनशक्ती होती, त्यांना पदोपदी जातीयतेचे विखारी चटके सहन करावे लागले. महार जातीचा असल्यामुळे त्यांचा अमानुष छळ केला गेला. काही समाज वगळता अख्खा देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब डगमगले नाहीत, जराही खचले नाहीत किंवा त्यांना घाबरून पळाले नाहीत. नित्यनेमाने व सातत्याने आपले काम करतच राहिले. बाबासाहेबांना ना भावकी होती ना त्यांच्याकडे मुबलक पैसा होता. सगळा समाज बाबासाहेबांच्या विरोधात असताना सुद्धा बाबासाहेब इथल्या मनुवादी, जातीवादी व सनातनी विचारधारेच्या लोकांना कायद्याचा दणका देऊन समतावादी व मानवतावादी जीवन जगायला शिकवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकटेच होते आणि निम्म्याहून अधिक देश बाबासाहेबांच्या विरोधात होता तरीसुद्धा बाबासाहेब जराही डळमळले नाहीत किंवा ध्येयापासून विचलित झाले नाहीत. मनुवादी, जातीवादी व धर्मांध लोकांच्या छाताडावर पाय देऊन या देशात सर्वधर्मसमभाव जपणाऱ्या भारतीय संविधानाची निर्मिती करून या देशाला जगात आदर्श व महासत्ता बनवले आहे...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता. अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.7498715661**

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
सोमवार दि. 15 सप्टेंबर 2025

# सीओईपी टेक मध्ये अभियंता दिन सोहळा : नवे ग्रंथालय आणि संगणक अभियांत्रिकी इमारतीचे उद्घाटन






पुणे: 14 सप्टेंबर, 2025: सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठात 14 सप्टेंबर रोजी अभियंता दिनानिमित्त एक विशेष सोहळा पार पडला. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवे केंद्रीय ग्रंथालय आणि संगणक अभियांत्रिकी इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सीओईपीचे कुलगुरु प्रा. सुनील भिरुड, सीओईपी अल्युमिनी असोसिएशनचे अध्यक्ष भरत गीते, आणि इतर मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा सीओईपी परिवारासाठी एक अभिमानाचा क्षण ठरला.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीओईपीला 'विकसित महाराष्ट्राचा अग्रदूत' आणि 'भारतातील एक महान संस्था' असे संबोधले. त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये अभियंत्यांच्या योगदानाला अनमोल ठरवले. मुख्यमंत्र्यांनी सीओईपीला अधिक बळकट करण्यासाठी आवश्यक निधी आणि संसाधने पुरवण्याचे आश्वासन दिले. शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता दिल्यास नाविन्यतेला प्रोत्साहन मिळेल, असे सांगत त्यांनी सीओईपीसारख्या संस्थांना अधिक स्वायत्तता देण्याची ग्वाही दिली. त्यांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि क्वांटम पान 3 वर

## तिकडे लेकीची पोलिस भरतीची तयारी, इकडे OBC आरक्षणासाठी बापानं स्वत:चं आयुष्य संपवलं

### » बीडमध्ये हळहळ




बीड : मराठा (Maratha) समाजाला हैदराबाद गॅझेटनुसार आरक्षण देण्यासाठी काढलेल्या जीआरनंतर ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. अशातच आता ओबीसी बांधवांकडून आत्महत्येसारखं टोकाचं पाऊल उचललं जात आहे. ओबीसी आरक्षण बचावासाठी बीडच्या पिंपळनेर येथील गोरक्ष देवडकर यांनी टोकाचं पाऊल उचलत गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यांची मुलगी पोलीस भरतीची तयारी करत होती. मात्र आता ओबीसीतलं (OBC) आरक्षण संपत आहे या नैराश्यातून त्यांनी हे पाऊल उचलल्याचं त्यांची मुलगी व नातेवाईकांनी सांगितलं आहे. 'आता माझी जबाबदारी कोण घेणार? माझे वडील तर गेले आहेत', पान 3 वर

## ओबीसी आरक्षण अन् मुलींच्या नोकरीची चिंता असह्य, पित्याची आत्महत्या



बीड, :- महाराष्ट्रात आरक्षणावरुन वातावरण चांगलंच तापलेला असताना बीडमधून धक्कादायक प्रकार समोर आलाय. नाथापूर गावातील गोरख नारायण देवडकर या 50 वर्षीय व्यक्तीने ओबीसी आरक्षणाच्या विवंचनेतून आत्महत्या किल्ल्याची माहिती समोर येत आहे. सध्या राज्यातील आरक्षणाची स्थिती पाहता मुलींच्या शिक्षणाचे कसे होईल असा प्रश्न त्यांना सतावत होता. यात विवंचनेतून त्यांनी आत्महत्या केल्याचं त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितलं.

राज्यभरात मराठा आणि ओबीसी आरक्षणावरुन आक्रमक वातावरण पाहायला मिळत असताना बीड तालुक्यातील नाथापुर गावात गोरख नारायण देवडकर या 50 वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केली आहे. ओबीसी आरक्षण जात असल्याच्या पान 3 वर

## शेतघरातील महिलेच्या मृत्यू प्रकरणात पतीच निघाला हत्यारा




परळी वैजनाथ : परळी तालुक्यातील डाबी येथे काल दिनांक 13 रोजी सकाळच्या सुमारास शेत घरामध्ये एका गृहिणीचा रक्तरंजित मृतदेह आढळून आला होता. तिच्या मृतदेहावरील शस्त्राच्या घावांमुळे ही हत्याच असल्याचे निदर्शनास येत होते. मात्र याप्रकरणी कोणीही ठामपणे पुढे न आल्याने गुढ वाढले होते. आता या प्रकरणात मयतेच्या मुलाने फिर्याद दिली असून यानुसार मयत महिलेचा नवराच हत्यारा असल्याचे स्पष्ट झाले आहे. आरोपीला परभणी येथून पोलिसांनी अटकही केली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त अधिक माहितीनुसार, डाबी गावाजवळील आखाड्यावर असलेल्या शेतघरात मयत पान 3 वर

## "हिंदी आमचा आत्मा आहे, तिचा सन्मान करणे आमचे कर्तव्य आहे. ही भाषा आपल्या भारतीय संस्कृतीचे व एकतेचे प्रतीक आहे-दीपक तांदळे

### ➲ संस्कार प्राथमिक शाळा पद्मावती विभागात हिंदी दिवस उत्साहात साजरा




परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात हिंदी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था) तसेच पद्मावती विभागाचे पर्यवेक्षक श्री इंगळे सर व दैठणेकर सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत कबीर दास व शिक्षणमहर्षी कै. विठ्ठलरावजी तांदळे सर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

यावेळी सचिव श्री दीपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की, "14 सप्टेंबर 1949 रोजी घटना समितीने भारतीय संघराज्याच्या राज भाषेत ऐतिहासिक निर्णय घेऊन हिंदी भाषेला राजभाषेचा सन्मान दिला. त्यामुळे दरवर्षी 14 सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये सध्या बावीस भाषांना राष्ट्रभाषा म्हणून दर्जा देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या 17 व्या भागात परिच्छेद 343 पासून 351 पर्यंत जी कलमे नमूद आहेत, त्यानुसार हिंदी ही भारतीय संघराज्याची पान 3 वर

## ब्रम्हगावात आयुष्यमान कार्डचे वाटप - अनिलराधे मित्र मंडळाचा उपक्रम




माजलगाव, प्रतिनिधी :- राज्यातील जनतेकरिता मोफत पाच लाख रुपयांच्या उपचारासाठी गरजेचे असलेल्या आयुष्यमान कार्डचा कॅम्प घेवुन त्याचे वाटप दि. 12 सप्टेंबर 2025 रोजी ब्रम्हगावात उपसरपंच अनिलराधे कांबळे यांचा मुलगा साम्राज्य अनिल कांबळे याच्या वाढदिवसानिमीत्त करण्यात आले.

शहरापासुन जवळच असलेल्या ब्रम्हगाव येथील अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने विवीध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते पान 3 वर

# ॲड राज पाटील यांनी उपोषणाची चेतावणी देताच तलावात सोडले पाणी

### ➲ आमदार प्रकाश सोळंके यांच्या पाठपुराव्याला आले यश



वडवणी प्रतिनिधी तुडुंब भरुन वाहत असलेल्या सोन्नाखोटा येथील अप्पर कुंडलिकाचे पाणी मामला चिंचोटी तीगाव या छोट्या छोट्या तलावांना कालव्याद्वारे सोडावे अशी मागणी लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड राज पाटील यांनी प्रशासनाकडे केली होती. पाणी सोडले नाही तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासून उपोषण करण्यात येईल असा इशारा राज ॲड पाटील यांनी दिला होता. माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी प्रशासनाला या तलावात पाणी सोडणे किती गरजेचे आहे त्या दृष्टीने सूचना केल्या त्यामुळे शुक्रवारी पाटबंधारे विभागाच्या वतीने तलावात पाणी सोडण्यात आले. त्यामुळे लढा दुष्काळाशी फाऊंडेशनचे अध्यक्ष



ॲड राज पाटील यांनी प्रकाश सोळंके यांचे आभार मानले आहे. वडवणी पान 3 वर

## बंजारा विराट महामोर्चात लाखोच्या संख्येने उपस्थित रहा - रोहिदास पवार

### हैदराबाद गॅझेट बंजारा समाजाचा तात्काळ का लागू करा



वडवणी (प्रतिनिधि) महाराष्ट्र सरकारने 2 सप्टेंबर रोजी मराठा समाजाला ओबीसी मध्ये समाविष्ट करण्यासाठी कुणबी आरक्षण देण्यासाठी हैदराबाद गॅजेटईयरचा संदर्भ देऊन शासन निर्णय जाहीर केला आहे. या धर्तीवर बंजारा समाजाला हाच गॅजेट लागू करून शासन निर्णय जाहीर करावा व बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात समाविष्ट करावा. हैदराबाद संस्थांमधील नोंदी पाहून बंजारा समाज हा अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात मोडतो याच आधारे आंध्रप्रदेश, तेलंगणा या राज्यात बंजारा समाज अनुसूचित जमातीच्या प्रवर्गात आरक्षणाचा फायदा घेतोय. या संविधानिक मागणीसाठी 15 सप्टेंबर रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बंजारा समाजाचा विराट मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे,तरी बंजारा पान 3 वर

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तुलसी महाविद्यालयाचे वर्चस्व; विविध कलाप्रकारात पटकावली सात बक्षिसे

### करिअर घडवण्यासाठी पाय जमिनीवर ठेवणे आवश्यक - प्रा.प्रदीप रोडे



बीड (दि.14) – विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर साधण्यासाठी धैर्य, प्रामाणिक मेहनत आणि पाय जमिनीवर ठेवणे आवश्यक आहे. यश आणि अपयश क्षणभुंगर असतात, परंतु सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनत हाच यश मिळवण्याचा मार्ग आहे, असे प्रतिपादन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने 11 व 12 सप्टेंबर रोजी पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीडच्या संघाने नाट्यकला, संगीत, नृत्य, वाद्यप्रस्तुती, वक्तृत्व, चित्रकला आणि आत्मकथन अशा सात पान 3 वर

## विद्यापीठाच्या जिल्हा युवा महोत्सवात महिला महाविद्यालयाचा प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक

### केंद्रीय युवक महोत्सवासाठी संघाची निवड

परळी वैजनाथ दि.13 (प्रतिनिधी) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे पार पडलेल्या जिल्हा युवा महोत्सव 2025-26 मध्ये कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाने नेत्रदीपक यश मिळविले असून प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.



या जिल्हा युवा महोत्सवात प्रश्नमंजुषा या प्रकारामध्ये महिला महाविद्यालयाच्या स्नेहा हमीने , स्नेहल शिंदे व ज्योती जुनाळ या तिघींच्या संघाने जिल्ह्यातील सहभागी पान 3 वर

## परळी लोकन्यायालयात प्रकरणे 66 प्रकरणे तडजोडीने निकाली.

परळी वैजनाथ परळी तालुका विधी सेवा समिती व परळी वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाणी व फौजदारी तथा विविध बँका पतसंस्था महावितरण इत्यादी संस्था यांचे प्रकरणे सामंजस्याने व तडजोडीने निकाली काढण्यात आली.

दिनांक 13 सप्टेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात आलेल्या या लोक अदालतीत दाखल पूर्व 25 व दाखल प्रकरणे मिटले 41 मिळून 66 प्रकरणे निकाली निघाली आणि एकूण रक्कम वसुली 97 लाख 50 हजार 104 रुपयांची बँक पतसंस्था यांची वसुली झाली आहे .सदर लोकन्यायालयात पंच परळी न्यायालयाचे न्या डि आर बोर्डे न्या डि वाय रायरीकर ॲड मोहन कराड ॲड बुद्धरत्न उजगरे यांनी काम पाहिले. सदर लोक न्यायालय यशस्वी करण्यासाठी न्या परळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड एच व्ही गुट्टे ॲड आर.व्हि. गित्ते ॲड प्रदिप गिराम ॲड आर व्हि देशमुख ॲड मिर्झा मंजुर अली ॲड.माधवराव मुंडे ॲड वैजनाथ नागरगोजे ॲड दिलीप स्वामी ॲड पान 3 वर

## उपप्राचार्य पदी नियुक्ती बद्दल प्रा. डॉ.अनिता शिंदे यांचा सत्कार संपन्न

### (नागसेन बुद्ध विहार येथे हृद सत्कार संपन्न)



बीड (प्रतिनिधी) - फुले,शाहू, आंबेडकर यांच्या विचारानुसार व "बहुजन हिताय बहुजन सुखाय" हा मुल मंत्र जपून शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या आदरणीय स्वर्गवासी केशर काकूंच्या के.एस.के कॉलेज वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी संस्थेच्या वतीने मला दिलेल्या उपप्राचार्य पदाच्या जबाबदारीला तडा न जाऊ देता के.एस.के कॉलेजचा यशाचा जो आलेख उंचावलेला. आहे त्यात वरिष्ठांच्या सहाय्याने अधिक कसा उंचावेल असा प्रयत्न माझ्याकडून केला जाईल असे सद्गतीत होऊन भावोद्गार प्रा.डॉ.अनिता शिंदे यांनी नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड .बीड येथे विहार कमिटीतर्फे केलेल्या सत्कार प्रसंगी काढले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी आयु. केशरताई कांबळे लाभल्या होत्या तर पाहुणे छाया धनवे, सुनिता शिंदे त्याची उपस्थिती पान 3 वर

## विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव देणे व त्यांचा सर्वांगीण विकास करणे, शाळेबाबत व अभ्यासाबाबत आवड निर्माण करणे व आदर्श भारतीय नागरिक घडविणे हेच आमचे ध्येय.- दीपक तांदळे

### » संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात इयत्ता दुसरी चा पालक सुसंवाद मेळावा उत्साहात संपन्न




परळी ( प्रतिनिधी ) - शहरातील पद्मावती शिक्षण संस्था संचलित, संस्कार प्राथमिक शाळा, पद्मावती विभागात इयत्ता दुसरी वर्गाचा पालक सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या पालक सुसंवाद मेळाव्याचे अध्यक्ष श्री. कैलास तांदळे (अध्यक्ष, पद्मावती शिक्षण संस्था) प्रमुख पाहुणे श्री. दीपक तांदळे (सचिव, पद्मावती शिक्षण संस्था) तसेच पद्मावती विभागाचे पर्यवेक्षक श्री इंगळे सर व दैठणेकर सर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणमहर्षी कै.विठ्ठलराव तांदळे सर तसेच हिंदी दिननिमित्य,संत कबीर यांच्या प्रतिमा पूजन व पुष्प अर्पण करुन यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.

श्री दीपक तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की "विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व अभ्यासाबाबतीत त्यांच्यात आवड निर्माण करणे हेच आमचे ध्येय आहे. आम्ही संस्कार प्राथमिक शाळेच्या माध्यमातून परळी तालुक्यातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण देवून त्यांचा सर्वांगीण पान 3 वर